# सार्वजनिक बांधकाम विभाग भरती (PWD)

# संपूर्ण मार्गदर्शक


**1500+ PYQ's आणि अतिसंभाव्य प्रश्नांसह**

- सर्व नॉन-टेक्निकल विषयांचा समावेश
- सर्व विषयांचे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न
- उत्तम आकलनासाठी साध्या व सोप्या भाषेत मांडणी
- जलद उजळणी साठी उपयुक्त

पुस्तक मागणीसाठी संपर्कः

**8263954946**
**9607155111**

INFINITY® Engineering Academy



# श्री स्वामी समर्थ...

स्वामींच्या चरणी अर्पण ...

# प्रस्तावना

नमस्कार,

स्पर्धा परिक्षाची तयारी करणाऱ्या सिव्हील इंजिनिअरींगच्या परिक्षार्थ्यांना "सार्वजनिक बांधकाम विभाग महाभरती २०२३ संपूर्ण मार्गदर्शक" हे पुस्तक सादर करताना अत्यंत आनंद होत आहे.

PWD परीक्षेची तयारी करताना एकाच पुस्तकात सर्व विषयांचा अभ्यास करता यावा, या उद्देशाने या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. अशा प्रकारचं हे एकमेव पुस्तक आहे. 1000 हुन अधिक PYQ आणि अतिसंभाव्य प्रश्न या पुस्तकात आहे. ज्यामध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान आणि बौद्धिक चाचणी असे सर्व नॉन टेक्निकल चे ४ महत्वाचे विषय यात हाताळले आहेत. सामान्य ज्ञान अंतर्गत इतिहास, महाराष्ट्राचा व भारताचा भूगोल, भारतीय राज्यव्यवस्था भारतीय अर्थव्यवस्था, पर्यावरण, अशा विषयांचा समावेश यात समावेश आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग मधील खालील पदांसाठी हा अभ्यासक्रम खूप उपयुक्त आहे :

कनिष्ठ अभियंता CIVIL / ELECTRICAL, कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (गट क), लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब ), लघुलेखक (निम्न श्रेणी) (गट ब), उद्यान पर्यवेक्षक (गट क), सहाय्यक कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ (गट क), स्वच्छता निरीक्षक (गट क), वरिष्ठ लिपिक (गट क), प्रयोगशाळा सहाय्यक (गट क), वाहनचालक (गट क), स्वच्छक (गट ड), शिपाई (गट ड).

सार्वजनिक बांधकाम विभाग च्या मागील परीक्षेतील प्रश्नांचा उत्तरासहित यात समावेश आहे. उत्कृष्ठ व आकर्षक मांडणी, विषयवार आणि मुद्देसूद मांडणी हे या पुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे हे पुस्तक तुम्हाला परिपूर्ण तयारीसाठी निश्चित उपयुक्त ठरेल. अशाप्रकारे या पुस्तकाचा अभ्यास तुम्हाला तुमच्या स्पर्धा परिक्षेच्या प्रवासासाठी मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही. हे पुस्तक सर्व परिक्षार्थ्यांसाठी अनिवार्य आहे.

'इन्फिनिटी ॲकॅडमी'च्या सर्व टीमचा मी आभारी आहे, ज्यांनी सखोल अभ्यास आणि संशोधन करून कमी वेळात हे पुस्तक आपल्यासमोर सादर केले आहे. त्यांच्याशिवाय हे अशक्य होते.

आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा घेण्यासाठी सज्ज व्हा. तुमच्या या प्रवासात आम्ही तुमच्यासोबत आहोत. स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या सर्व परिक्षार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा...!

सदर पुस्तकात चुका आढळल्यास 7057492418 या क्रमांकावर वॉट्स ॲप मेसेज करा.

**आपला**

**गिरीश खेडकर**

infinity® Engineering Academy

# INDEX

## CIVIL ENGINEERING (NON-TECHNICAL)


मराठी ............................................................ 1

ENGLISH ............................................................ 80

सामान्य ज्ञान ............................................................ 178

इतिहास ............................................................ 179

महाराष्ट्रातील समाज सुधारक ............................................................ 212

भारताचा भूगोल ............................................................ 226

महाराष्ट्राचा भूगोल ............................................................ 247

भारतीय राज्यव्यवस्था ............................................................ 288

भारतीय अर्थव्यवस्था ............................................................ 348

पर्यावरण ............................................................ 379

जिल्हावार संक्षिप्त आढावा ............................................................ 424

बौद्धिक चाचणी ............................................................ 508

अंकगणित ............................................................ 509

तर्कशास्त्र ............................................................ 531

# भारतीय राज्यव्यवस्था

infinity®
Engineering Academy

# 1. भारतीय संविधान उगम व वैशिष्ट्ये

## भारतीय घटनेची निर्मिती प्रक्रिया

- ब्रिटीश राजवट आणि भारतीय स्वातंत्र्यलढा यांच्या आंतरप्रक्रियेतून संविधानिक चौकटीची रुपरेषा निर्माण झाली.
- 1924 - मोतीलाल नेहरू - केंद्रीय विधीमंडळात मागणी - भारतासाठी संविधान असावे
- 1927 - राष्ट्रीय सभेची संविधानांचा आराखडा तयार करावा अशी मागणी.
- 1928 - राष्ट्रीय सभेची घटनेची मूलभूत तत्वे ठरवण्यासाठी समिती.
- 1934 - राष्ट्रीय सभेचा घटना समितीच्या मगणीसाठी प्रस्ताव.
- 1940 - 15 ऑगस्ट घोषणा - अप्रत्यक्षपणे मागणी मान्य.
- 1942 - क्रिप्स मिशन - संविधान निर्मितीची जबाबदारी भारतीयांचीच
- 1946 - कॅबिनेट मिशन - प्रांतिक विधीमंडळातून घटनासमितीसाठी निवडणूक प्रांताला लोकसंख्येच्या प्रमाणात जागा अनुसूचित जाती जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात जागा संस्थानिकांनाही प्रतिनिधित्व.

## संविधान सभेचे कामकाज

(Working of the Constituent Assembly)

- 29 डिसेंबर, 1946 (सोमवार) रोजी सकाळी 11 वाजता न्यू दिल्ली येथील 'कॉन्स्टिट्युशन हॉल'मध्ये (सध्याचा 'सेंट्रल हॉल ऑफ पार्लमेंट हाऊस') संविधान सभेची पहिली बैठक भरली.
- मुस्लिम लिगने स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केल्याने लिगचे सदस्य बैठकीला हजर राहू शकले नाही. त्यामुळे केवळ 211सदस्य बैठकीला हजर होते. फ्रान्सच्या पद्धतीचे अनुसरण करून जेष्ठतम सदस्य असलेल्या डॉ.सच्चिदानंद सिन्हा यांची संविधान सभेची तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यांच्या नावाची शिफारस आचार्य जे.बी.कृपलानी यांनी केली.
- सच्चिदानंद सिन्हा यांनी तात्पुरते अध्यक्ष या नात्याने प्रथम यु.एस.ए. चीन आणि ऑस्ट्रेलिया या तीन देशांकडून आलेल्या सदिच्छा संदेशांचे वाचन केले.
- सच्चिदानंद सिन्हा यांनी आरोग्याच्या तक्रारीमुळे दुपारनंतर फ्रँक ॲन्थनी यांना तात्पुरते उपाध्यक्ष म्हणून कार्य करण्यासाठी नामनिर्देशित केले. या दिवशी हजर असलेल्या 207 सदस्यांनी आपल्या योग्यता (credentials) सादर करून रजिस्टरवर सह्या केल्या. त्यांमध्ये 9 महिला सदस्या होत्या.
- 11 डिसेंबर, 1946 रोजी डॉ.राजेंद्र प्रसाद यांची संविधान सभेचे कायमस्वरूपी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.
- 13 डिसेंबर, 1946 रोजी जवाहरलाल नेहरू यांनी संविधान सभेत "उद्देश पत्रिका' (Objectives Resolution) मांडली.) तिच्यामध्ये घटनात्मक संरचनेची मूलतत्वे व तत्वज्ञान देण्यात आलेले होते.
- 22 जानेवारी, 1947 रोजी संविधान सभेने तिचा स्विकार केला. ही उद्देश पत्रिका घटना निर्मितीच्या पुढील सर्व टप्प्यांवर मार्गदर्शक ठरली. भारतीय राज्यघटनेची प्रास्ताविका/ सरनामा (preamble) उद्देशपत्रिकेवरूनच तयार करण्यात आलेला आहे.
- 25 जानेवारी 1947 रोजी एच.सी.मुखर्जी (हरेंद्र कुमार मुखर्जी) यांची संविधान सभेचे उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

## घटना समितीतील महत्त्वपूर्ण समित्या

| समिती | अध्यक्ष |
|---|---|
| 1. सुकाणू समिती | डॉ राजेंद्र प्रसाद |
| 2. वित्त व स्टाफ समिती. | डॉ राजेंद्र प्रसाद |
| 3. केंद्रिय राज्यघटना समिती. | पंडीत जवाहरलाल नेहरू |

| | |
|---|---|
| 4. प्रांतीय राज्य घटनासमिती. | सरदार वल्लभभाई पटेल |
| 5. मूलभूत हक्क समिती | सरदार वल्लभभाई पटेल |
| 6. मसुदा समिती | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |

## मसुदा समिती (Drafting Committee)

- 29 ऑगस्ट, 1947 रोजी डॉ.आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीकडे घटनेचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली.
- या समितीमध्ये एकूण सात सदस्य होते:

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर: अध्यक्ष
2. एन.गोपालस्वामी अय्यंगारः अय्यंगार हे पूर्वी आय.सी.एस.चे सदस्य होते. पुढे 1937 ते 1943 दरम्यान त्यांनी जम्मु-काश्मिरचे पंतप्रधान म्हणून कार्य केले.
3. अल्लादी कृष्णस्वामी अय्यर अय्यर यांनी 1929 ते 1944 दरम्यान (मद्रास प्रांताचे ॲडव्होकेट जनरल म्हणून कार्य केले होते.
4. सईद मुहम्मद सादुल्लाह यांनी 1937 ते 1946 दरम्यान तीन वेळा आसाम प्रांताचे पंतप्रधान म्हणून कार्य केले होते. एप्रिल 1937 ते सप्टें, 1938, नोव्हेंबर 1938 ते डिसेंबर 1941 आणि ऑगस्ट 1942 ते फेब्रुवारी 1946.
5. डॉ.के.एम.मुन्शी: त्यांनी पूर्वी 1937 ते 1940 दरम्यान बॉम्बे प्रांताचे गृहमंत्री म्हणून कार्य केलेले होते.
6. एन.माधव राव (बी.एल.मित्तर यांनी अनारोग्याच्या कारणामुळे राजीनामा दिल्याने एन.माधव राव यांची नियुक्ती करण्यात आली.) एन.माधव राव यांनी पूर्वी म्हैसूर राज्याचे दिवाण म्हणून कार्य केलेले होते.
7. टी.टी.कृष्णमाचारी 1948 मध्ये डि.पी.खेतान यांच्या मृत्यनंतर कृष्णमाचारी यांची नियुक्ती करण्यात आली.

## घटनेची स्विकृती (Enactment of the Constitution)

- डॉ. आंबेडकरांनी 4 नोव्हेंबर, 1948 रोजी घटनेचा अंतिम मसुदा संविधान सभेत मांडला.
- मसुद्याचे तीनदा वाचन व चर्चा झाल्यानंतर 26 नोव्हेंबर, 1949 रोजी घटना स्विकृत करण्यात आली. या तारखेचा उल्लेख घटनेच्या प्रास्ताविकेमध्ये असून या दिवशी भारतीय जनतेने (संविधान सभेच्या माध्यमातून) घटना अंगीकृत व अधिनियमित करून स्वत:प्रद अर्पण केली. .
- 26 नोव्हेंबर, 1949 रोजी स्विकृत करण्यात आलेल्या मूळ घटनेत प्रास्ताविका, 22 भाग, 395 कलमे व 8 अनुसूचींचा समावेश होता.
- पुढे 24 जानेवारी, 1950 रोजी उपस्थित असलेल्या 284 सदस्यांनी घटनेवर सह्या केल्या. घटनेच्या तीन प्रतींवर सह्या करण्यात आल्या.

## संविधान सभेच्या समित्या

| **समितीचे नाव** | **अध्यक्ष** |
|---|---|
| संघटनात्मक समित्या | |
| 1. कार्यपद्धती नियम समिती | राजेंद्र प्रसाद |
| 2. सुकाणू समिती | राजेंद्र प्रसाद |
| 3.स्टाफ व वित्त समिती | राजेंद्र प्रसाद |
| 4.योग्यता (Credentials) समिती | अल्लादी कृ. अय्यर |
| 5.ऑर्डर ऑफ बिझनेस समिती | के.एम.मुन्शी |
| 6.संस्थानिकांशी चर्चेसाठी समिती | जवाहरलाल नेहरू |
| 7.ध्वज/फ्लॅग समिती | राजेंद्र प्रसाद |
| 8.संविधान सभेच्या कार्यावरील समिती (भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्याखाली) | जी.व्ही.मावळणकर |
| 9.हाऊस समिती | पट्टाभी सितारामय्या |
| **प्रमुख समित्या व त्यांच्या उप-समित्या** | |
| 1.मूलभूत हक्क, अल्पसंख्यांक, आदिवासी आणि वगळलेली क्षेत्रे यांवरील सल्लागार समिती | वल्लभभाई पटेल |
| i. मूलभूत हक्क उप-समिती | जे.बी.कृपलानी |
| ii. अल्पसंख्यांक उप-समिती | एच.सी.मुखर्जी |

# महाराष्ट्रातील जिल्हे व त्यांचे वैशिष्ट्य

infinity® Engineering Academy

# 1.कोकण विभाग




## मुंबई शहर

**निर्मिती** : सन 1990 पर्यंत मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे म्हणजे तत्कालीन बृहन्मुंबई या जिल्ह्याचाच एक भाग होते. सन 1990 मध्ये बृहन्मुंबईचे विभाजन करण्यात येऊन मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांची निर्मिती केली गेली.

**स्थान व विस्तार** : मुंबई शहर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम भागात वसला आहे. या जिल्ह्याच्या पश्चिमेस, दक्षिणेस व पूर्वेस अरबी समुद्र असून उत्तरेस मुंबई उपनगर हा जिल्हा आहे.

**जिल्हा मुख्यालय** : मुंबई, तालुके : तालुके नसलेला जिल्हा.

**क्षेत्रफळ** : मुंबई शहर जिल्ह्याचे आकारमान अवघे 157 चौ. कि. मी. इतके आहे. या जिल्ह्याने राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या केवळ पाच टक्के एवढा भाग व्यापला असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने हा जिल्हा 'राज्यातील सर्वांत लहान जिल्हा ठरतो.

**घनता** : प्रति चौ. कि. मी. ला 19,652 व्यक्ती. लोकसंख्येची घनता विचारात घेता या जिल्ह्याचा मुंबई उपनगर जिल्ह्यानंतर राज्यात दुसरा क्रमांक लागतो..

**भू-रचना** : मुंबई शहर जिल्हा म्हणजे वस्तुत: मोठा कुलाबा, धाकटा कुलाना, मुंबई, माझगाव, परळ, वरळी व माहिम अशा एकमेकांना जोडण्यात आलेल्या सात बेटाचा समूह होय.

मुंबई बेटाच्या निर्मितीचे श्रेय **जेराल्ड अँजिअर** या ब्रिटिश प्रशासकास दिले जाते. त्याच्याच कारकिर्दीत वरील सात बेटांच्या दरम्यान असलेल्या उथळ खाड्या व खाजणे बुजविण्यास सुरुवात झाली होती व पुढे सलग अशा मुंबई बेटाची निर्मिती झाली. जेराल्ड अंजिअर याच्या या कार्यामुळे त्यास **'आधुनिक मुंबईचा शिल्पकार'** म्हणून ओळखले जाते.

मुंबई बेटावर पूर्व व पश्चिम भागात नैर्ऋत्य-ईशान्य दिशेत पसरलेले, एकमेकांना समांतर असलेले दोन कि.मी उंचीचे कटक आहेत. पश्चिम भागातील कटक मलबार हिलपासून वरळीपर्यंत पसरलेला असून मलबार हिल येथे या कटकाची समुद्रसपाटीपासूनची उंची 55 मीटर इतकी आहे. मुंबई बेटावरील हा सर्वांत उंच परिसर आहे; तर पूर्वेकडील कटक मुंबई बेटाच्या डोंगरीपासून शीवपर्यंत तुटक-तुटक पसरलेला आहे. या कटकाचे भू-शिर नरिमन पॉईंट' म्हणून ओळखले जाते.

हवामान:जिल्ह्याचे हवामान उष्ण, दमट व सम प्रकारचे आढळते. मे महिन्यामध्ये जिल्ह्याचे सरासरी तापमान 33° से. इतके; तर जानेवारी महिन्यामध्ये ते सरासरी 19° से. इतके असते. जून ते सप्टेंबर या कालखंडात नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांपासून सरासरी 180 सें. मी. पाऊस पडतो.

**नद्या** :मोठ्या नद्या नाहीत...

**वने (अरण्ये)**:जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या 1.27 टक्के क्षेत्र वनांखाली आहे. दाट लोकसंख्या, उद्योगधंद्यांची प्रचंड वाढ तसेच वाढत्या लोकसंख्येचे जमिनीवर होणारे आक्रमण यांमुळे जिल्ह्यात वने आंढळत नाहीत. तथापि, माहिमच्या खाडीत 'सुंद्री' वनस्पती आढळते.

**खनिजे**:खनिजे नाहीत. तथापि, समुद्रकिनाऱ्यालगत मीठ काढले जाते. तसेच, मुंबईपासून 240 कि. मी. अंतरावरील 'मुंबई हाय' येथे समुद्रातून खनिज तेल मिळविले जाते.

**उद्योगधंदे** : मुंबई शहरास 'भारताची व्यापारी राजधानी' म्हणून संबोधले जाते; कारण भारताच्या सागरी मार्गाने होणाऱ्या एकूण परदेशी व्यापारापैकी सुमारे 25 टक्के व्यापार मुंबई बंदरातून चालतो. देशातील महत्त्वाच्या कंपन्या व त्यांची कार्यालये, रिझर्व्ह बँक तसेच अन्य बँका यांची मुख्यालये येथेच आहेत.

मुंबई शहर जिल्ह्यात अनेक कापडगिरण्या, सूतगिरण्या, इलेक्ट्रॉनिक वस्तू व इंजिनिअरिंग उत्पादने यांचे कारखाने आहेत. मुंबई शहरातील कापडगिरण्यांची संख्या लक्षात घेता या शहरास 'भारताचे मँचेस्टर' असे म्हटले जाते.

**वाहतूक** : मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांतर्गत स्थानिक प्रवासासाठी मुंबईतील मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वे या मार्गावरून अनुक्रमे बोरीबंदर-मुलुंड (मुंबई उपनगर), चर्चगेट-दहिसर (मुंबई उपनगर) या लोकलगाड्या धावतात; तर हार्बर लाईन ही मध्य रेल्वेची शाखा मुंबईच्या पूर्व भागातून जाते.

छत्रपती शिवाजी टर्मिनसहून मुंबई-दिल्ली, मुंबई-कोलकाता आणि मुंबई-चेन्नई (मध्य रेल्वे); मुंबई-दिल्ली (पश्चिम रेल्वे) हे प्रमुख लोहमार्ग जातात.

मुंबई शहर भारतातील सर्व प्रदेशांशी रस्त्यांनी जोडलेले आहे. **मुंबई-आग्रा (राष्ट्रीय महामार्ग क्र. 3); मुंबईदिल्ली (राष्ट्रीय महामार्ग क्र. 2); मुंबई-चेन्नई (राष्ट्रीय महामार्ग क्र.4)** हे राष्ट्रीय महामार्ग मुंबईहून सुरू होतात.

**मुंबई बंदरा**तून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशी दोन्ही प्रकारची जलवाहतूक चालते. मुंबई किनाऱ्यावर अनेक ठिकाणी बोटी उभ्या राहण्यास अनुकूल प्राकृतिक स्थिती आहे. ससून डॉक, इंदिरा डॉक, माझगाव डॉक, व्हिक्टोरिया डॉक, प्रिन्सेस डॉक यांसारख्या गोद्या येथे आहेत. भारतीय नौदलास लागणाऱ्या जहाजांची निर्मिती 'माझगाव डॉक' या गोदीत केली जाते..

**मुंबईतील विमानतळा**वरून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्वरूपाची वाहतूक चालते. मुंबईतील सांताक्रूझ येथील विमानतळावरून प्रामुख्याने देशांतर्गत; तर सहार येथील छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक चालते.

**प्रेक्षणीय स्थळे** : जिल्ह्यात अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. सन 1911 मध्ये राजा पाचवा जॉर्ज व राणी मेरी यांच्या स्वागतासाठी बांधण्यात आलेले भारताचे प्रवेशद्वार- **गेट वे ऑफ इंडिया**, गेट वे ऑफ इंडियापासून सागरी मार्गाने 9 कि. मी. अंतरावर असलेले घारापुरी येथील **एलेफंटा केव्हज्**; सन 1881 मध्ये बांधण्यात आलेले फिरोजशाह मेहता उद्यान (पूर्वीचे **हँगिंग गार्डन**); गांधीजींच्या वास्तव्याने पुनित झालेले मणीभवन **(गांधी मेमोरियल)**; इंग्रजांच्या गॉथिक शैलीचा उत्तम नमुना असलेली सन 1878 मध्ये पूर्णत्वास आलेली **उच्च न्यायालयाची इमारत**; इटालियन गॉथिक शैलीतील **व्हिक्टोरिया टर्मिनस** (आताचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- या इमारतीच्या रचनेचे श्रेय एफ. डब्ल्यू. स्टिव्हन्स यांना दिले जाते.); **मंत्रालय; विधानभवन; मुंबई विद्यापीठ** ही जिल्ह्यातील प्रमुख प्रेक्षणीय स्थळे आहेत.

याशिवाय मरिन ड्राईव्ह, चौपाटी, तारापोरवाला मत्स्यालय, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझिअम, राजाबाई टॉवर, जहांगीर आर्ट गॅलरी, नेहरू विज्ञान भवन, महालक्ष्मी मंदिर, संपूर्ण संगमरवरी असलेले जैन मंदिर ही जिल्ह्यातील पाहण्यायोग्य ठिकाणे आहेत.

## मुंबई उपनगर

**स्थान व विस्तार** : मुंबई उपनगर हा जिल्हा साष्टी बेटाच्या उत्तर भागात वसला आहे. या जिल्ह्याच्या दक्षिणेस मुंबई शहर जिल्हा व नैर्ऋत्येस माहिमची खाडी, पश्चिमेस अरबी समुद्र, उत्तरेस ठाणे जिल्हा आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्याने राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या 0.14 टक्के म्हणजेच राज्याच्या एकूण क्षेत्रफळाचा केवळ 690 वा हिस्सा व्यापलेला आहे. या जिल्ह्याचा पूर्व-पश्चिम विस्तार 30 कि. मी. इतका असून याचे क्षेत्रफळ 446 चौ. कि. मी. इतके आहे.

**जिल्हा मुख्यालय** : वांद्रे

**तालुके** : (3) अंधेरी, कुर्ला, बोरिवली.

**लोकसंख्या** : 93,56,962 (2011 प्राथमिक ) : मुंबई उपनगर हा ठाणे (विभाजनपूर्व) व पुणे या जिल्ह्यांनंतर म्हणजे राज्यातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकसंख्येचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात लोकसंख्येची घनता प्रति चौ. कि.